*कामगारांना रस्त्यावर येण्याची पाळी येणे, यामुळे तेथील कामगारांमध्ये निर्माण झालेला असंतोष, तेथील अन्य इमारती प्रमाणे १३ चाळीतील सफाई कामगार भाडेकरुंना न्याय देण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याची परवानगी देण्याची व मेट्रो ट्रेनच्या प्रकल्पामुळे त्यांचे होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने त्यांचे पुनर्वसन करण्याची योजना आखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*(५) श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"झपाट्याने विकसित होणाऱ्या आणि वीस लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये मेट्रो सुरु करण्याचे केंद्र शासनाच्या विचारधीन असून नाशिकसाठी मेट्रो सुरु करण्याची मागणी प्रलंबित असणे, देशातील महत्वाच्या स्मार्ट सिटीमध्ये नाशिकचा समावेश झालेला असल्यामुळे नाशिकमध्ये मेट्रोचे सर्वेक्षण होणे आवश्यक असणे, नाशिक शहर आणि प्रस्तावित नाशिक महानगर प्राधिकरणाची २६ लाख ८३ हजार लोकसंख्या आणि २५९ चौ.कि.मी. विस्तार असणे, नाशिकमध्ये आता सर्वेक्षण सुरु केले तर ८ ते १० वर्षांनी मेट्रो साकारली जाऊ शकणार असणे, शहराचा झपाट्याने होणारा विकास तसेच आगामी काही वर्षातील वाढणारी लोकसंख्या याचा विचार केला तर दळणवळणाची साधने अपुरी पडणार असणे, त्यामुळे नाशिक मेट्रोसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्यासाठी शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."*

*(६) सर्वश्री.विक्रम काळे, श्रीकांत देशपांडे, दत्तात्रय सावंत वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वित्त मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"राज्यातील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत आलेल्या शिक्षक व कर्मचाऱ्यांना नवीन अंशदायी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेणे, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या व दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर कायम वेतनश्रेणीत आलेल्या शिक्षक सेवकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेणे, परंतु दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या परंतु त्या शाळांना अनुदान नसणे, टप्पा अनुदान असणे व १ नोव्हेंबर, २००५ नंतर त्या शाळा १०० टक्के अनुदानावर येणे, म्हणून त्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना जुन्याऐवजी नविन पेन्शन योजना लागू करण्याचा अन्यायकारक निर्णय घेणे, या विरोधात शिक्षक कर्मचाऱ्यांनी न्यायालयात दाद मागणे, मा.उच्च*

*२०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले असणे, या प्रस्तावानुसार वांद्रे व मांडवा येथे या रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार असून त्यामध्ये अदययावत तंत्रज्ञान असलेली उपकरणे, साहित्ये तसेच तज्ञ डॉक्टरही असतील अशी तरतूद असणे, काही वर्षापूर्वी सार्वजनिक आरोग्य विभागाने दुर्गम भागातील खाडी किनाऱ्यावरील नागरिकांसाठी बोट रुग्णवाहिका सुरु केली असणे, डॉक्टर त्या बोटीतून त्या भागात जाऊन नागरिकांवर उपचार करीत असणे, त्याला चांगला प्रतिसादही मिळालेला असणे त्याच धर्तीवर सागरी रुग्णवाहिका सुरु करण्याचा प्रस्ताव सागरी मंडळाने तयार केलेला असणे, परंतु या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनमानसांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने जनहित लक्षात घेऊन सदर प्रस्तावाला तातडीने मंजूरी देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(१०) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकताच व्यावसायिक सरोगसी वर बंदी आणणारा कायदयाचा मसुदा मंजूर करण्यात येणे, सदरहू कायदयामुळे सरोगसीचा बाजार काही अंशी कमी होईल, परंतु या सरोगसीमध्ये व्यवहारिक बाबींसोबत काही नैतिकतेचे बंधन असणेही आवश्यक असणे, राज्यातही सरोगसीसाठी गर्भाशय भाडयाने देणाऱ्या महिला या विशेषत: मुंबईतील मानखुर्द, मालवणी, धारावी, नवी मुंबई, पनवेल येथील कानाकोपऱ्यात असणे, नऊ महिन्यासाठी हा भाडोत्री गर्भ वाढवला की त्यातून दोन ते तीन लाख रुपयांचा मोबदला मिळतो परंतु या प्रक्रियेमध्ये बीजाचे फलनीकरण करताना जुळं किंवा तिळं झालं तरी पैसे एका बाळाचेच मिळणे, मात्र गर्भ रुजवण्यापूर्वी तीन ते चार महिने वैद्यकिय उपचार सुरु होऊन त्या उपचारादरम्यान या महिलेला पौष्टिक आहाराची गरज असणे, परंतु आधीच आर्थिक चणचण असलेल्या स्वत:ची तीन चार बाळंतपण झालेल्या या महिलांना पौष्टीक आहार मिळत नसणे, अशा महिलांचा दलालही टक्केवारी वाढवून तिला मिळालेल्या पैशातही हिस्सा घेणे, मग त्या तुटपुंज्या मोबदल्यातून या प्रक्रियेतून जाणाऱ्या महिलांना होणारे साईड इफेक्ट तसेच विविध शारिरीक व मानसिक आजारांना सामोरे जावे लागणे, याकरिता शासनाने अशा सरोगसी महिलांची पुढील शारिरीक व मानसिक काळजी घेण्याकरिता टास्क फोर्स नेमण्याची आवश्यकता, शासनाने योग्य ते*

